वि.दि.दावा क्र. १५४/२०२३
मंदाबाई ठाकरे वि. रामराव
निशाणी क्र.३०

वादीतर्फे साक्षीदार क्र.१ रंगराव आत्माराम ठाकरे,
मी शपथेवर सांगतो की,

**<u>साक्षीदाराचा पुढील उलटतपास प्रतिवादी क्र. १, २, ८ आणि ९ तर्फे विधीज्ञ श्री. पालीवाल यांद्वारे –</u>**

माझी पत्नी आजारी असल्याबाबत डॉक्टरांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केले आहे. हे म्हणणे खरे नाही की कोणतेही कारण नसतांना मी माझ्या पत्नीला, प्रतिवादी विरुद्ध दावा दाखल करण्यास भाग पाडले. दाव्याचे कागदपत्र काही पत्नीने व काही मी काढले.

माझे लग्न १९७३ साली झाले. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ यांनी माझ्या पत्नीचे म्हणजेच त्यांच्या मुलीचे लग्न करुन दिले. माझे लग्न झाले त्यावेळेस प्रतिवादी क्र.२ हा एक वर्षाचा होता. मी दावा मिळकतीचे क्रमांक सांगु शकतो. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीची वाटणी झाल्यापासुन, त्या वाटपाबाबतची माहिती माझ्या पत्नीला होती. हे म्हणणे खरे नाही की माहिती नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ चे खसरा क्र.९२ मधील प्लॉट क्र.२१ हा त्यांच्या मालकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर प्लॉट नं.२१ वर प्रतिवादी क्र.२ ने घर बांधले आहे. माझ्या लग्नाच्या वेळेस प्रतिवादी क्र.१ हे शेतीचा व्यवसाय करत होते. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस प्रतिवादी क्र.१ धान्य विक्रीचा देखिल व्यवसाय करत होते. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ यांनी धान्य विक्रीचा व्यवसाय करुन, त्यातुन मिळणा–या उत्पन्नातुन दावा मिळकती विकत घेतल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत पत्नीची वडीलोपार्जित मिळकत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ हे मोहनच्या घरी राहत होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की मोहन हे रामरावच्या घरी राहत होते.

प्रश्न– रामरावच्या वयोवृध्दपणाच्या काळात त्यांची देखभाल ही त्यांची मुल करत होती
उत्तर सर्व करत होते.

हे म्हणणे खरे नाही की मी अथवा माझ्या पत्नीने, रामरावची कोणतीही सेवा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी अथवा माझी पत्नी पारशिवनी अथवा खंडाळा येथे रामरावसोबत राहिलो नाही. वाद शेतीचे वाटप कोणत्या वर्षी झाले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की सन २००५ मध्ये वाटप झाले म्हणुन, माझ्या पत्नीने प्रांत अधिकारी यांच्याकडे अपिल केले होते. हे म्हणणे खरे आहे की प्रांत अधिकारी यांच्याकडील अपिल हे नामंजुर झाली होती. नागपुर येथील घर आणि प्लॉटचे मुल्यांकन मी दाखल केले आहे. सदर फाईलमध्ये सदरचे मुल्यांकन साक्षीदार दाखवु शकला नाही. नागपुर येथील घर मिळकतीची अंदाजे किंमत ही सवा करोड आहे. साक्षीदाराला दाव्यातील कलम १८ फ वाचुन दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की दाव्यामध्ये घर मिळकतीची किंमत ही अंदाजे नमुद केलेली आहे. इतर मिळकतीचे देखिल मुल्यांकन दाखल केले नाही. हे मला माहित नाही की दावा मिळकतीचे मुल्यांकन जाणिवपुर्वक कमी केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं. ३८, ४३, ८२, १११ याच्यापैकी सर्वे नं.१११ आणि ८२ ही प्रतिवादी क्र.१ याच्याकडे, आज रोजी झालेल्या वाटपानुसार आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर वाटपानुसार सर्वे नं.३८ मधील २हे ४२आर ही जमिन प्रतिवादी क्र.२ ला देण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं.४३ हा हंसराजला देण्यात आला आणि सर्वे नं.३८ मधील १हेक्टर हे त्याला देण्यात आले. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की सदरची माहिती ही त्याला कागदपत्र काढल्यानंतर समजली आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. ७ ला सर्वे ३७/२ हा विकत घेवुन दिला. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र.२ ने त्यांचे नातु रोहित आणि पंकज यांच्या नावे सर्वे नं. ८२ मधील जमिनीचे बक्षिसपत्र करुन दिले. बक्षिसपत्र रद्द करुन आम्ही मागितले आहे. हे म्हणणे खरे आहे की मी आणि माझी पत्नी नियमितपणे खंडाळा येथे जातो. हे मला माहित नाही की वरिल वाटपाप्रमाणे प्रत्येक जन त्याची वहिवाट करत आहे. हे म्हणणे खरे आहे की वाद मिळकतीवर माझ्या किंवा माझ्या पत्नीचा कधीही कब्जा वहिवाट नव्हती व प्रतिवादींच्या वहिवाटीस कधीही अडथळा अथवा आक्षेप घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की वाटपाबाबतची संपुर्ण माहिती मला व माझ्या पत्नीला पुर्वीपासुनच होती आणि त्यामुळे वाटपास कधीही आक्षेप घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पत्नीचा दावा

मिळकतीमध्ये कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी लोभापोटी खोटा दावा करुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मला माझ्या पत्नीतर्फे साक्ष देण्याचा अधिकार नाही.

**साक्षीदाराचा पुढील उलटतपास इतर प्रतिवादीं करिता –**

इतर प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर, सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.05.08 16:50:17 +0530

दिनांक ८.०५.२०२५
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.–II)